**L. A. BILL No. XXIV OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**ज्याअर्थी** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४.

२०२१ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता ;

(शा.म.मु.) एचबी १५४७—१ (८४०—१२-२०२१)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ६५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, दुसऱ्या परंतुकातील, "२०२०-२०२१" या मजकुरानंतर "व वर्ष २०२१-२०२२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९६१ चा महा. २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकातील "२०१९-२०२०" या मजकुरानंतर "व वर्ष २०२०-२०२१" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (२ब) मधील, "२०२०-२०२१" या मजकुरानंतर "व वर्ष २०२१-२०२२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८१ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८१ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मधील चौथ्या परंतुकामध्ये, जेथे तो आला असेल तेथे दोन्ही ठिकाणी "२०१९-२०२०" या मजकुरानंतर "व वर्ष २०२०-२०२१" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**५.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२१ चा महा. अध्या. ७.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कोविड-१९ वैश्विक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे आणि देशात घोषित केलेल्या टाळेबंदीमुळे, २४ मार्च २०२० पासून सामाजिक व आर्थिक कार्ये थांबलेली आहेत. टाळेबंदीमुळे राज्यातील सहकारी संस्थांच्या कामकाजावर देखील प्रतिकूल परिणाम झाला आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या अहवालानुसार आगामी दिवसांमध्ये कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेचा फैलाव देखील होणे अपेक्षित आहे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम यांनुसार सहकारी संस्थांनी करारनिविष्ट कालावधीत त्यांच्या नफ्याचा विनियोग करणे, त्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे आणि लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. तथापि, कोविड-१९ वैश्विक साथरोगाच्या फैलावामुळे, करारनिविष्ट केलेल्या कालावधीत या गोष्टी करणे अवघड होते. म्हणून, उक्त अधिनियमात यथोचित सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. प्रस्तावित सुधारणा पुढीलप्रमाणे होत्या :—

(एक) कलम ६५ च्या पोट-कलम (२) मधील दुसऱ्या परंतुकामध्ये अशी तरतूद होती की, संस्थेच्या नफ्याचा समितीच्या मान्यतेने २०२०-२०२१ या वित्तीय वर्षासाठी विनियोग करण्यात येईल आणि त्यानंतर घेतलेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे तो, अनुसमर्थनार्थ मांडण्यात येईल.

त्यामुळे, ही तरतूद वित्तीय वर्ष २०२१-२०२२ साठी देखील लागू करण्याचे प्रस्तावित केले होते.

(दोन) कलम ७५ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील पहिल्या परंतुकामध्ये अशी तरतूद केली होती की, संस्थेस, २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी, तिच्या लेखापुस्तकांचे लेखापरीक्षण, वित्तीय वर्षाची समाप्ती झाल्यापासून नऊ महिन्यांच्या आत, करून घेता येईल आणि वित्तीय वर्षाची समाप्ती झाल्यापासून बारा महिन्यांच्या आत, वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावता येईल.

त्यामुळे, ही तरतूद २०२०-२०२१ या वित्तीय वर्षासाठी देखील लागू करण्याचे प्रस्तावित केले होते.

(ख) पोट-कलम (२ब) मध्ये, अशी तरतूद केली होती की, समितीस, २०२०-२०२१ या वित्तीय वर्षामध्ये, शिल्लक रकमेचा विनियोग आणि पुढील वर्षाचा वार्षिक अर्थसंकल्प यावर निर्णय घेण्याचा आणि याबाबतीत, कलम ८१ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे किमान अर्हता व अनुभव असणाऱ्या, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेतील, लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या व्यवसाय संस्थेची नेमणूक करण्याचा अधिकार असेल. वरील प्रकरणांच्या बाबतीतील समितीचे निर्णय, त्यानंतर घेतलेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीमध्ये, अनुसमर्थनार्थ मांडण्यात येतील.

त्यामुळे, ही तरतूद, २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरिता देखील लागू करण्याचे प्रस्तावित केले होते.

(तीन) कलम ८१ मधील, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मधील, चौथ्या परंतुकामध्ये, अशी तरतूद केली होती की, २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता, संस्था, तिची लेखापरीक्षा, २०१९-२०२० या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून नऊ महिन्यांच्या कालावधीत, पूर्ण करण्याची व्यवस्था करील.

त्यामुळे, ही तरतूद, २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाकरिता देखील लागू करण्याचे प्रस्तावित केले होते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते, आणि, उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. ७) प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ११ नोव्हेंबर २०२१.

**बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.

## सन २०२१ चे वि. स. विधेयक क्र. २४.—महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१

### (महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अधिनियम, १९६० यातील उतारे)

### (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४)

**१.** ते **६४.** *** *** ***

**६५.** (१) *** *** *** नफा विनिश्चित करणे व त्याचे संविभाजन करणे.

(२) संस्थेस आपल्या निव्वळ नफ्याचा विनियोग राखीव निधी किंवा इतर कोणत्याही निधीसाठी सदस्यांना त्याच्या भागांवर लाभांश देण्यासाठी सदस्यांकडून आणि जे संस्थेचे सदस्य नसतील अशा इतर व्यक्तीकडून संस्थेच्या व्यवहारात जे सहाय्य मिळाले असेल त्याच्या आधारावर त्यांना अभिलाभांश देण्यासाठी त्यांनी मानधन देण्यासाठी आणि नियमात किंवा उपविधित विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येईल :

परंतु, वार्षिक सर्वसाधारण बैठकीत मान्यता दिल्याशिवाय आणि अधिनियम, नियम आणि उपविधी यांच्याशी सुसंगत असल्याखेरीज नफ्याच्या कोणत्याही भागाचा विनियोग करता येणार नाही.

" परंतु आणखी असे की, संस्थेच्या नफ्याच्या विनियोग, २०२०-२०२१ या वित्तीय वर्षामध्ये समितीच्या मान्यतेने करण्यात येईल आणि तो, त्यानंतर घेतलेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीमध्ये, अनुसमर्थनार्थ, मांडण्यात येईल.".

**६६.** ते **७४.** *** *** ***

**७५.** (१) प्रत्येक संस्था वित्तीय वर्ष समन्व झाल्यापासून चार महिन्याच्या कालावधीत आपले लेखापरीक्षण करून घेईल आणि अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे तिचे कामकाज चालविण्यासाठी वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावील : अधिमंडळाची वार्षिक बैठक.

" परंतु २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता, संस्थेस, तिच्या लेखा पुस्तकांची लेखापरीक्षा, तिच्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून नऊ महिन्यांच्या आत, करून घेता येईल आणि तिची वार्षिक सर्वसाधारण बैठक, तिच्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून बारा महिन्यांच्या आत, बोलाविता येईल :

परंतु संस्थेने अशी बैठक बोलाविली नसेल याबाबतीत निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास विहित केलेल्या रितीने अशी बैठक बोलाविता येईल आणि अशी बैठक ही संस्थेने योग्य रितीने बोलाविलेली सर्वसाधारण बैठक असल्याचे समजले जाईल आणि अशी बैठक बोलविण्यासाठी आलेला खर्च संस्थेच्या निधीतून किंवा निबंधकाच्या मते सर्वसाधारण बैठक बोलविण्यास नकार दिल्याबद्दल किंवा कसूर केल्याबद्दल जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती जबाबदार असेल/असतील ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती देतील, असा आदेश निबंधकास देता येईल.

(२) व (२अ) *** *** ***

"(२ब) समितीस, २०२०-२०२१ या वित्तीय वर्षामध्ये, शिल्लक रकमेचा विनियोग, पुढील वर्षाचा वार्षिक अर्थसंकल्प यावर निर्णय घेण्याचा आणि याबाबतीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेतून, कलम ८१ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे किमान अर्हता व अनुभव असणाऱ्या, लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या व्यवसाय संस्थेची नेमणूक करण्याचा अधिकार असेल. वरील प्रकरणांच्या बाबतीतील समितीचे निर्णय, त्यानंतर घेतलेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीमध्ये, अनुसमर्थनार्थ, मांडण्यात येतील.".

(३) ते (६) *** *** ***

**७६.** ते **८०.** *** *** ***

लेखापरीक्षा. **८१.** (१) (अ) संस्था, प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवील आणि असे लेखे ज्या आर्थिक वर्षाशी संबंधित असतील त्या आर्थिक वर्षाच्या समाप्तीपासून चार महिन्याच्या आत, कलम ७५ च्या पोट-कलम (२अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, किंवा समितीने त्यांच्या पोट-कलम (२ब) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संस्थेच्या अधिमंडळाकडून नेमण्यात आलेल्या, निबंधकाने तयार केलेल्या व राज्य शासनाने किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या नामिकेवर असणाऱ्या संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यास पात्र ठरण्यासाठी विहित करण्यात येईल. अशी आवश्यक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या, लेखापरीक्षकांकडून किंवा लेखापरीक्षक व्यवसाय संस्थेकडून आपल्या लेख्यांचे लेखापरीक्षण पूर्ण करवील आणि ती असा लेखापरीक्षा अहवाल अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीसमोर ठेवील, शिखर संस्थेच्या बाबतीत, लेखापरीक्षा अहवाल विहित करण्यात येईल अशारीतीने राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर देखील ठेवण्यात येईल :

परंतु, जर निबंधकाची अशी खात्री होईल की, संस्थेने कलम ७५ चे पोट-कलम (२अ) आणि कलम ७९ चे पोट-कलम (१ब) या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कळविण्यात आणि विवरण दाखल करण्यात कसूर केली आहे, तर ती कारणे लेखी नमूद करून, आदेशाद्वारे, त्यास राज्य शासनाने किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेतील एखाद्या लेखापरीक्षकाकडून तिच्या लेख्याची लेखापरीक्षा करवून घेता येईल :

परंतु, आणखी असे की, कोणताही लेखापरीक्षक, एक लाख रुपयांपेक्षा कमी भरणा झालेले भाग भांडवल असणाऱ्या संस्था वगळून, एका वित्तीय वर्षात लेखापरीक्षा करण्यासाठी वीस पेक्षा अधिक संस्थांची लेखापरीक्षा स्वीकारणार नाही :

परंतु तसेच की, निबंधक, राज्य शासनाने किंवा त्याने या संबंधात प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने, मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांची व लेखापरीक्षक व्यवसाय संस्थांची नामिका ठेवील ;

" परंतु, तसेच, २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता, संस्था, तिची लेखापरीक्षा, २०१९-२०२० या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून नऊ महिन्यांच्या कालावधीत, पूर्ण करण्याची व्यवस्था करील.".

| | | | |
|---|---|---|---|
| (ब) ते (ग) | *** | *** | *** |
| (२) ते (७) | *** | *** | *** |
| (८२) ते (१६८) | *** | *** | *** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई